# महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग

## मुख्य अभियंता (यांत्रिकी) जलसंपदा विभाग, नाशिक-४२२ ००२ यांचे कार्यालय.

### जाहिरात क्रमांक - १ सन २०११

संदर्भ : शासन पत्र क्र. संकीर्ण-१११०/(प्र.क्र.२५०/२०१०)/आ (तांत्रिक), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक १०.१०.२०११

उपरोक्त संदर्भिय शासन पत्रान्वये मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांचे अधिनस्त कार्यालयाचे आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) ची रिक्त पदे भरावयाची आहेत. त्यानुसार मुख्य अभियंता (यांत्रिकी) जलसंपदा विभाग, नाशिक-४२२ ००२ हे खाली नमूद केलेल्या कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या रिक्त पदाच्या भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित पुणे (Maharashtra Knowledge Corporation Ltd., Pune.(MKCL) ) यांच्यामार्फत विहीत नमून्यात अर्ज मागविंत आहेत.

सदर रिक्त पदांच्या भरतीसंबंधी जाहिरात व अर्ज भरावयाची सुविधा http://oasis.mkcl.org/mech2011 या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या http://www.maharashtra.gov.in या संकतेस्थळावर व मुख्य अभियंता (यांत्रिकी) जलसंपदा विभाग, नाशिक यांच्या http://www.mahayantriki.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पदाचे नांव : कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी ), गट-ब (अराजपत्रित)

### भरती करावयाच्या पदांची संख्या

| अ. क्र. | आरक्षण | | अ. जा. | अ.ज. | वि.जा (अ.) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | सामाजिक आरक्षण | | - | ०१ | - | - | - | - | - | ०१ | ४३ | ४५ |
| २ | समांतर आरक्षण | महिला ३० % | - | - | - | - | - | - | - | - | १४ | १४ |
| | | खेळाडू ५ % | - | - | - | - | - | - | - | - | ०२ | ०२ |

टिप- १) वरील रिक्त पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.
२) महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास पुरुष उमेदवारातून निवड करण्यात येईल.
३) अपंग उमेदवारांचा अनुशेष पूर्ण भरलेला असल्यामुळे अपंगासाठी आरक्षण विहीत केलेले नाही.

वेतनश्रेणी : रु. ९३००-३४८०० ग्रेड पे रु. ४३००/- + महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, शहर पूरक भत्ता व वाहन भत्ता इ. शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या शासन निर्णयानुसार देय राहतील.

पात्रता विषयक अटी :

अ) किमान शैक्षणिक अर्हता : शासन पत्र क्र. सेप्रनि-१२०७/१९५८/(५४/२००७)/आ (तांत्रिक) दिनांक १३.४.२०१० च्या सोबतच्या शासन अधिसुचना दि. १३.४.२०१० अन्वये प्रसारीत करण्यात आलेले कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) गट-ब (अराजपत्रित) उमेदवारांसाठीचे सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराने खालील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे.

१) ज्यांनी शासनाच्या महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून प्रदान करण्यात आलेल्या मेकॅनिकल इंजिनिअरींग किंवा ऑटोमोबाईल इंजिनिअरींग किंवा प्रॉडक्शन इंजिनिअरींग किंवा प्रॉडक्शन टेकनॉलॉजी मधील किमान तीन वर्ष कालावधीची पदविका धारण केलेली आहे.

२) पदावर नेमणूक झालेल्या उमेदवाराला हिंदी व मराठी भाषा परीक्षा आणि शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात आलेल्या इतर विभागीय आणि व्यावसायिक परीक्षा, जर अगोदरच उत्तीर्ण झाला नसेल किंवा त्या संदर्भातील नियमातील तरतुदीनुसार उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

३ ) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च, २००३ नुसार उपरोक्त पदांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणे/वापराबाबतचे D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा "O" स्तर किंवा 'A' स्तर किंवा 'B' स्तर किंवा 'C' स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे किंवा महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अथवा महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. मातंसं/नस्ती-०७/प्र.क्र.७१/३९, दिनांक २१.२.२००८ मध्ये विहीत पदव्युत्तर / प्रगत पदवीका अभ्यासक्रम उत्तीर्ण केलले उमेदवार पात्र असतील. जे उमेदवार उपरोक्त पैकी कोणतीही अर्हता धारण करीत नसतील तर त्यांनी सदरची अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त करणेत येईल.

उपरोक्त पैकी कोणतीही संगणक परीक्षा उत्तीर्ण असल्यास सदर प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे

ब) वयोमर्यादा : १) दि. ०१ / १२ /२०११ रोजी उमेदवाराचे वय १८ पेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय प्रवर्गासाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२) शासन सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६ मार्च १९९९ अन्वये सामाजिक व समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. कनिष्ठ अभियंता (यां) हे पद शासनाने गट-ब (अराजपत्रित) संवर्गात समाविष्ट केले असल्यामुळे या पदासाठी माजी सैनिकांसाठी आरक्षण विहीत केलेले नाही. तथापि माजी सैनिक/ प्रकल्पग्रस्त/ वेळोवेळी शासनाने घोषित केलेल्या प्रवर्ग यांचेसाठी शासनाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे वयोमर्यादा शिथील राहील.

क) इतर अटी : १) उमेदवार हा भारताचा नागरीक व महाराष्ट्रातील रहिवाशी असावा.महाराष्ट्राचा रहिवासी असल्याबाबत अधिवास ( Domicile ) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.

२) निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरिता शारिरीक क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे

३) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

महिला आरक्षणाबाबत :

१) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२ /२००१ मसेआ-२०००/ प्र.क्र. ४१५ / का-२ दिनांक २५ मे २००१ मधील तरतुदीनुसार महिलांचे आरक्षण राहील.

२) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला उमेदवारांना महिलांसाठी असलेले ३० % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील अनुसुचीत जाती/जमाती वगळता वि.जा(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) आणि

भ.ज.(ड) तसेच वि.मा.प्र. व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३० % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. या संदर्भात शासन निर्णय दिनांक २५.५.२००१ नुसार कुटूंबाच्या व्याखेमध्ये विवाहीत महिलेच्या बाबतीत पती,पत्नी व मुले यांचा समावेश राहील व अविवाहीत महिलांच्या (मुलींच्या) बाबतीत आई, वडिल व अविवाहीत भावंडे यांचा समावेश राहील.

३) महिलासाठी असलेले आरक्षण महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र. ८२/२००१/ मसेआ/२०००/प्रक्र-४१५/का-२ दिनांक २५.५.२००१व तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी सन २०११-१२हया कालावधीकरीता वैध असलेले (अर्थात दिनांक १.४.२०११ पासून अथवा तदनंतर निर्गमित केलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेयर) प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. महिलांच्या कोटयातील पदावर महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर आरक्षण त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधुन भरण्यात येईल.

४) विवाहीत स्त्रियांच्या नांवात बदल झालेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नांवात बदल झाल्यासंबंधी कायदेशीर पुरावा जोडणे आवश्यक आहे.

<u>खेळाडूसाठी असलेले आरक्षणाबाबत :</u>

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग के. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२ दिनांक ३०.४.२००५ नुसार क्रीडाविषयक आर्हता धारण करणा-या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी ५ % आरक्षण ठेवण्यात आले आहे.त्यानुसार खालील अटी पूर्ण करणारे उमेदवार अर्ज करु शकतील.

अ) खेळाडू पदासाठी त्या त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये महाराष्ट्रातर्फे प्रतिनिधीत्व करतांना राष्ट्रीय अजिंक्य स्पर्धेत प्रथम/द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सूवर्ण/रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू असणे आवश्यक आहे.

ब) खेळाडू पदासाठी अर्ज करतांना सदर स्पर्धा या संबंधीत खेळांच्या भारतीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या राष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा भारतीय ऑलिम्पिक समितीने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात.

क) खेळाडू पदासाठी अर्ज करतांना उपरोक्त स्पर्धाव्यतिरिक्त असलेल्या स्पर्धा या मान्यताप्राप्त खेळांच्या असून राष्ट्रीय स्तरावरील भारतीय ऑलिम्पिक समितीच्या मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात. यामध्ये सहभागी होणा-या खेळाडूंची निवड ही राज्य स्पर्धातून झालेली असावी.

ड) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू सदस्यांना खेळाडूसाठी असलेले ५ % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील अनुसुचीत जाती/जमाती वगळता वि.जा(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) आणि भ.ज.(ड) तसेच वि.मा.प्र. व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत गटातील आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूंचे ५ % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

<u>लेखी परीक्षा व मुलाखतीबाबत :</u>

लेखी व मौखिक परिक्षेकरिता खालील प्रमाणे अभ्यासक्रम राहील.

अ) यांत्रिकी अभियांत्रिकी पदविका / स्वयंचलीत अभियांत्रिकी पदविका / उत्पादन अभियांत्रिकी पदविका / उत्पादन तंत्रज्ञान पदविका ( Diploma in Mechanical Engineering / Automobile Engineering / Production Engineering / Production Technology.) या तीन वर्षाच्या अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट असलेले सर्व अभियांत्रिकी विषय.

ब) महराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षेसाठी असलेला संगणक अभ्यासक्रम.

क) सामान्यज्ञान

अर्जाचा नमुना :

१) ऑनलाईन अर्ज http://oasis.mkcl.org/mech2011 या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :

१) शैक्षणिक अर्हता, जन्मतारखेचा दाखला, तसेच मागासवर्गीय असल्याबाबतचा सक्षम अधिका-यांचा जातीचा दाखला इ. च्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती मौखिक परीक्षेच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

२) मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करावे. मागास वर्गीय प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/२००९/१६-ब, दिनांक ५ नोंव्हेबर २००९ अन्वये जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्ती देण्यात येणार नाही.

३) महाराष्ट्र अधिवास दाखला ( Domicile ) प्रमाणपत्र

४) ज्या उमेदवारांना लागु आहे अशा उमेदवारांनी नॉनक्रिमीलेयर सन २०११-१२ करिताचे विहीत प्रमाणपत्र जोडावे.

परीक्षेचे केंद्र : अर्जदाराने त्याच्या सोईनुसार नागपूर / अमरावती / नाशिक/ मुंबई / पुणे / औरंगाबाद यापैकी कमीत कमी तीन परीक्षा केंद्रांचा पसंतीक्रम देणे बंधनकारक आहे. त्यादृष्टीने योग्य ती खबरदारी घ्यावी. एकदा दिलेल्या पसंतीक्रमात पुन्हा बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी. उमेदवार उपलब्धतेनुसार त्यांनी दिलेल्या पसंतीक्रमातील एक परिक्षा केंन्द्र Maharashtra Knowledge Corporation Ltd., Pune निश्चित करुन देतील.

सर्वसाधारण शर्ती व अटी :

१) शासन धोरणानुसार सदर पदावर नेमणुक झालेल्या उमेदवारास सेवा सुरु झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या आत खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यावसायिक परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

२) या पदावर नियुक्ती केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यांत कोठेही बदली होण्यास पात्र असेल.

३) शासनाने भरती बाबत / नियुक्ती बाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके आदेश इ. लागू राहतील. भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रिया पूर्ण होई पावेतो सुधारीत शासन निर्णय / परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.

४) अर्जांच्या छाननीनंतर, सर्व पात्र उमेदवारांची १७५ गुणांची वस्तुनिष्ठ लेखी परीक्षा (Objective Written Test) घेण्यांत येईल. तद्नंतर लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांची उपलब्ध पदानुसार लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणानुसार मर्यादित उमेदवारांची २५ गुणांची मौखीक चांचणी मुख्य अभियंता (यां) कार्यालयाने गठीत केलेल्या निवड समिती मार्फत घेण्यांत येईल. लेखी व मौखिक परीक्षेस उमेदवारांना स्वखर्चाने यावे लागेल.

५) महाराष्ट्र राज्य लोकसेवा, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. या अधिनियमातील नियम क्र.४ (२)(दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमि लेअर) तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीवगळता सर्व प्रवर्गांना लागू असेल अशी तरतूद केलेली आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व “वि.जा.(अ)”, “भ.ज.(ब)”, “भ.ज.(क)”, “भ.ज.(ड)”,

"विशेष मागास प्रवर्ग" व "इतर मागासवर्ग" यांना लागू आहे. याबाबतच्या अंमलबजावणीचे आदेश शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-१०/२००६/ प्र.क्र.१५/मावक-५, दिनांक ३० जून २००६ अन्वये आता निर्गमित केले असून सोबत या वर्गवारीकरिता आवश्यक असलेल्या सुधारित प्रमाणपत्राचा नमुना विहित केला आहे. त्यानुसार या प्रवर्गाचे उमेदवारांनी जातीचे तसेच सन २०११-१२हया कालावधीकरीता वैध असलेले (अर्थात दिनांक १.४.२०११ पासून अथवा तदनंतर निर्गमित केलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेयर) प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. सदर शासन परिपत्रक व प्रमाणपत्राचा नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक (युनिक कोड) २००६०७१०१२२४५८००१ असा आहे. दिनांक ३१ मार्च २०११ अखेर उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे, असे न केल्यास अशा उमेदवारांची गणना खुल्या प्रवर्गातून केली जाईल.

६) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे होत नाही. निवडीच्या टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण न करणारा आढळल्यास किंवा गैरवर्तन करतांना आढळल्यास,तसेच निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव तंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्याची उमेदवारी अपोआप रद्दबादल होईल. व उमेदवारास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

७) उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांचा बारकाईने अभ्यास करावा. उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती बरोबर आहे असे गृहित धरुन कोणत्याही टप्प्यावर पडताळणीच्या अधीन राहून अर्ज स्विकृत करण्यात येतील. उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी आवश्यक त्या सर्व अर्हता/आरक्षण उमेदवार धारण करीत नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

८) जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे विहीत नमून्यातील अर्ज विहीत मुदतीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचरात घेतले जाणार नाहीत.

९) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, सेवायोजन कार्यालयाकडे, कार्यालय येथे नांव नोंदविले असले तरी देखील त्यांनी या पदाच्या भरतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे व सदर नोंदणी प्रमाणपत्राची सांक्षांकित केलेली छायांकित प्रत अर्जासोबत सादर करण्यात यावी.

१०) शासनाने शासकीय विभागातील गट - अ, ब, क आणि ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र विहित करणारे "महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५" दिनांक २८ मार्च, २००५ च्याअधिसूचनेद्वारे पारीत केले आहे. या नियमातील तरतूदींच्या अधीन राहून ही जाहिरात प्रसिध्द करण्यांत येत आहे. प्रतिज्ञापत्र नमुना- अ http://oasis.mkcl.org/mech2011 या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर प्रतिज्ञापत्र विवाहीत उमेदवारांनी अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील. सदरचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत प्राप्त न झाल्यास संबंधीत उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल. अविवाहीत उमेदवारांनी सुध्दा प्रतिज्ञापत्रात अविवाहीत असल्याचे नमूद करुन प्रतिज्ञापत्र सोबत सादर करणे बंधनकारक आहे.

११) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा ४, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

१२) शासन सेवेतील कर्मचा-यांनी कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) पदासाठी अर्ज करताना त्यांच्या नियंत्रक अधिका-यांना तसे कळवावे व याबाबत त्यांची काही हरकत नसल्याबाबत, मुख्य अभियंता (यांत्रिकी) जलसंपदा विभाग, त्रिंबक रोड, नाशिक-२, यांना एक महिन्याच्या आंत याबाबत कळविण्याची विनंती करावी. नियंत्रक अधिका-यांना वरीलप्रमाणे कळविलेल्या पत्राची प्रत अर्जासोबत पाठवावी.

१३) संकेत स्थळावर अर्ज भरण्याची शेवटची तारीख १२/०१/२०१२ ही राहील. संकेत स्थळावर भरलेल्या अर्जावर उमेदवाराने स्वतःचा पासपोर्ट आकाराचा फोटो व स्वतःची सही स्कॅन करुन अर्जावर योग्य ठिकाणी अपलोड करावा व त्याची प्रिंटआऊट काढल्यानंतर आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडून विहित धनाकर्षासह MKCL पुणे येथे अर्ज दिनांक १९/०१/२०१२ या अंतिम तारखेपर्यंत संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावेत. या तारखे व वेळे नंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

१४) पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणा-या लेखी परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती **MKCL** च्या संबंधीत संकेतस्थळावर उपलब्ध राहील. परीक्षेबाबतचे प्रवेशपत्र सर्व उमेदवारांना **MKCL** च्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाईल. ज्यात परीक्षेचा दिनांक, परीक्षेचे स्थळ व परीक्षा केंद्राचे नांव नमूद केलेले असेल. ज्या उमेदवारांना प्रवेशपत्र मिळणार नाही त्यांनी MKCL शी संपर्क साधून प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे. कोणत्याही परिस्थितीत अधिकृत प्रवेश पत्राशिवाय उमेदवारांना परीक्षेस बसू दिले जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

१५) रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण, याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मुख्य अभियंता (यां), जलसंपदा विभाग, नाशिक हे स्वतःकडे राखून ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

## अर्ज करण्याची पध्दत :

१.अर्जाचा विहीत नमुना http://oasis.mkcl.org/mech2011 या संकेत स्थळावर दिनांक २४ /१२ /२०११ पासून मिळेल.

२. अर्जदाराने संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील अर्ज पुर्ण भरल्यानंतर उमेदवाराने स्वतःचा पासपोर्ट साईज स्वतःचा फोटो व सही स्कॅन करून अर्जावर योग्य जागी अपलोड करावी व त्याची छापिल प्रत ( Printout ) काढावी.

३. अर्जासोबत जोडण्यात येणा-या प्रमाणपत्राच्या प्रती राजपत्रित अधिकारी अथवा सक्षम अधिका-याकडून स्वाक्षांकित करुन सादर कराव्यात.

४. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.३००/- (रुपये तीनशें फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांनी रु.१५०/- (रुपये एकशे पन्नासं फक्त) चा राष्ट्रीय कृत बॅंक्च्या पुणे येथे देय असलेला धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) Maharashtra Knowledge Corporation Ltd., Pune या नांवाने काढावा तसेच सदर डिमांड ड्राफ्टचे पाटीमागे अर्जदाराचे नांव व अर्ज क्रमांक नमूद करावा व सदर डिमांड ड्राफ्ट अर्जासोबत जोडावा.

उपरोक्त सुचनेनुसार परिपुर्ण माहिती व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज खालील पत्त्यावर फक्त पोस्टाने (स्पीड पोस्ट/रजिस्टर पोस्ट/बुक पोस्ट) पाठवावा.

**Maharashtra Knowledge Corporation Limited,**
**MS-IHMCT (Hotel Management College) Campus**
**Ground Floor, 412-C, Next to Bahirat Patil Chowk,**
**Shivaji Nagar, Pune 411016**

अधिक माहितीसाठी संपर्क : ०२१६७-३०४२०४

उमेदवारांनी आपले अर्ज उपरोक्त पत्त्यावर दि. १९/०१/२०१२ रोजी सायं.५.०० वाजेपर्यत फक्त पोस्टाने पोहोचतील याची खात्री करुन घ्यावी. टपाल खात्याची दिरंगाई वा अन्य कोणतेही कारण असो, कोणत्याही परिस्थितीत वरील कालमर्यादा काटेकोरपणे पाळली जाईल आणि त्याकरिता अर्ज मागविणे व तो भरुन पाठविणे या दोन्ही क्रिया उमेदवारांनी अत्यंत तत्परतेने पार पाडणे त्यांच्या हिताचे राहील. याबाबत अर्ज विहीत कालावधीत प्राप्त न झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

(ज.म.जाधव)
मुख्य अभियंता (यांत्रिकी)
जलसंपदा विभाग,नाशिक-४२२००२.
दूरध्वनी क्र.(०२५३) -२५७८३५४

ठिकाण :- नाशिक
दिनांक :- २०/१२/२०११